


(वर्ष ९५) चैत्र ते ज्येष्ठ – शके १९४५ – एप्रिल ते जून २०२३ (संयुक्तांक ७ ते ९)

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल/वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री भाईंचे प्रवचन | ८ |
| ३) | सद्गुरु श्री दादाभाईंचे प्रवचन | २० |
| ४) | विशेष अहवाल | २६ |
| ५) | उत्सव – महोत्सवातील कार्यक्रम | २८ |
| ६) | शोकवृत्त | ३१ |
| ७) | अमृतकण | ३२ |
| ८) | निवेदन | ३४ |
| ९) | शोकवृत्त | ३६ |

।। श्री सद्गुरु प्रसन्न ।।



## - संपादकाचे बोल -
## (वर्षे ९५) चैत्र ते ज्येष्ठ (शके १९४५)
## (संयुक्तांक ७ ते ९)
## (एप्रिल ते जून२०२३)

सद्भक्ति प्रकाशचा ९५वे अर्थे वर्षे पार करून वाटचाल करीत आहे. मंदिराचे शताब्दी वर्ष आहे तसेच या अंकाचे पण शताब्दी वर्ष येईलच ही खात्री आहे. सद्गुरुंचा या सिद्ध हस्त शिरावर असताना ही आशा द्विगुणित होणारच. मंदिराचे सर्व

दैनंदिन कार्यक्रम पार पाडण्यासाठी श्री सद्गुरुंनी सर्व सद्भक्तांना शक्ति द्यावी ही त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

पौष, माघ, फाल्गुन (जानेवारी ते मार्च) महिन्यांतील उत्सव महोत्सवांचा गोषवारा :-

**(पौष मास)**

रविवार दि. १.१.२०२३ रोजी गोखिवरे येथील श्री कृष्ण मंदिराचा स्थापना दिन होता. काही सद्भक्तांनी मंदिरात जाऊन भजने म्हटली व दर्शन घेतले.

शुक्रवार दि. १३.१.२०२३ (पौष वद्य षष्ठी) श्री तात्यासाहेब कोटणीस महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रातः स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

रविवार दि. १५.१.२०२३ रोजी मकरसंक्रांती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. सायंकाळी ५.३० वाजता 'तीळगूळ घ्या, गोड गोड बोला' या विषयावरील प्रवचनाचे वाचन झाले व तीळगूळ देऊन गोड गोड बोलण्याचे आश्वासन दिले गेले.

बुधवार दि. १८.१.२०२३ (पौष वद्य एकादशी - षट्तिळा एकादशी) गुरुमाता श्री पार्वतीमाता पुण्यतिथी दिन होता. प्रातः स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना केली गेली. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन झाले.

**(माघ मास)**

परात्पर गुरु श्री नारायणबाबा (रत्नागिरी वासी) व परमश्रेष्ठी गुरु राधाकृष्ण तोरणे पुण्यतिथ्योत्सव.

रविवार दि. २२.१.२०३ (माघ शुद्ध प्रतिपदा) मातोश्री श्री लक्ष्मीमाता पुण्यतिथी दिन होता. प्रातः स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

सोमवार दि. २३.१.२०२३ (माघ शुद्ध द्वितीया) रोजी परात्पर गुरु नारायण (रत्नागिरी वासी) व परमश्रेष्ठी राधाकृष्ण तोरणे ह्यांचा पुण्यतिथी दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली. ११.३० वाजता एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा ही नित्याची पदे व इतर पदे म्हणण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता चरित्रवाचन झाले.

बुधवार दि. २५.१.२०२३ (माघ शुद्ध चतुर्थी) ला श्री गणेश जयंती होती. प्रातः स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता 'श्री सिद्धीविनायकाचे व्यापक स्वरूप' या विषयावरील प्रवचन वाचन झाले. सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले. त्यावेळी सुमधुरपदे म्हणण्यात आली.

गुरुवार दि. २६.१.२०२३ (माघ शुद्ध पंचमी - वसंत पंचमी)ला शांता दुर्गा महोत्सव होता. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. बाळमंडळाचा वाढदिवस होता. सायंकाळी ७ वाजता

रासलिलाभिनय झाला. त्यावेळी श्रीकृष्ण भक्तिपर पदे म्हणण्यात आली व नंतर ‘वैकुंठीचा प्रसादमेवा’ या सद्गुरु श्री दादाभाईच्या प्रवचनाचे वाचन झाले.

शनिवार दि. २८.१.२०२३ (माघ शुद्ध सप्तमी)ला रथसप्तमी होती. सकाळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

रविवार दि. ५.२.२०२३ (माघ पौर्णिमा) रोजी श्री मंगेश महोत्सव होता. रात्रौ ९ वाजता रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक संपन्न झाली.

बुधवार दि. १५.२.२०२३ (माघ वद्य नवमी)ला श्री रामदास नवमी होती. प्रातः स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता श्री रामदास स्वामीचे चरित्र वाचन झाले.

शनिवार दि. १८.२.२०२३ (माघ वद्य चतुर्दशी) रोजी महाशिवरात्र होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. श्री रामेश्वर मंदिरातर्फे दि. १९.२.२०२३ला सकाळी ६.३० वाजता पालखी मिरवणूक निघाली.

मंगळवार दि.२१.२.२०२३ (माघ वद्य द्वितीया)ला श्री रामकृष्णपरमहंस जयंती होती. सकाळी स्तवन व प्रार्थना केली गेली. सायंकाळी भजनानंतर ६ मार्च १९२७ रोजी खार मिशनमध्ये झालेल्या प्रवचनाचे वाचन झाले.

**(फाल्गुन मास)**

श्री दत्तमूर्तींच्या व श्री नारायण महाराजांच्या सुवर्ण पादुका

स्थापना दिन व श्री रामेश्वर मंदिराच्या वर्धापन दिन व श्री रघुनाथ स्वामी पादुका स्थापना दिनाचा महोत्सव.

रविवार दि. २६.२.२०२३ (फाल्गुन शुद्ध सप्तमी) रोजी श्री रघुनाथ स्वामी महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रातः स्मरमाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता एकादशणी झाली. त्यावेळी नित्याच्या पदांबरोबर इतर पदे व प्रार्थना म्हणण्यात आली.

बुधवार दि. १.३.२०२३ (फाल्गुन शुद्ध दशमी) रोजी श्री दत्तमूर्ती व श्री नारायण महाराजांच्या सुवर्ण पादुका स्थापना दिन व श्री रामेश्वर मंदिराचा वर्धापन दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. ११.३० वाजता एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझी ही नित्याची पदे व इतर सुमधूर पदे म्हणण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता जगदाराध्ये श्री दत्तमूर्ती (त्रिमूर्ती)च्या स्थापना विषयावरील प्रवचनाचे वाचन झाले. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक संपन्न झाली.

गुरुवार दि. २.३.२०२३ (आमलकी एकादशी) पासून श्री एकनाथ महाराजांचे ओवीबद्ध चरित्र म्हणजे प्रतिष्ठान चरित्र वाचनास प्रारंभ झाला.

## परमप्रिय सद्‌गुरु श्री दादाभाई पुण्यतिथ्योत्सव

सोमवार दि. ६.३.२०२३ (फाल्गुन शुद्ध चतुर्दशी)ला गौरांग प्रभू जयंती दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली

गेली.

मंगळवार दि. ७.३.२०२३ (फाल्गुन वद्य प्रतिपदा) या दिवशी परमप्रिय सद्‍गुरु दादाभाईंचा पुण्यतिथी दिन होता. प्रातः स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता गुरुपादुकांस एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) अधिर नयन झाले हे पहाया। रूप गुरुराया दिव्य तुझे। (४) येई वो लवलाहे कृपानिधी (५) गुरुचे भजन हेंचि माझे ध्यान। तेंचि पूर्ण ज्ञान जाण माझे (६) गुरुजी तोरे पैया पर सीस धरुं (७) तो मज आठवतो गुरुराजा। प्राण विसावा माझा। (८) यारे यारे सद्‍गुरुच्या घरी जाऊ। प्रेम भक्तिचा सोहळा डोळां पाहूं।। (९) या गुरुसि काया बा पावे।। (१०) मी बाळ तूं जननी सद्‍गुरुमाते।। (११) साकार मूर्तिचे दर्शनाची चाड। नते ते आवड कैवल्याची।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण संतर्पण व महाप्रसाद झाला. त्याचा सर्व सद्‍भक्तांनी लाभ घेतला. सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठान चरित्राचे वाचन झाले. नंतर सद्‍गुरु दादाभाईंचे वैकुंठारोहण वाचन. सद्‍गुरु दादाभाईंचे ध्वनिमुद्रित शेवटचे प्रवचन श्रवण झाले. त्यावेळी (१) भगवद्‍चरणी तल्लीन होऊनी। देहावरती येवू नको हा मधुर फटका (२) लागे लागे मना गुरुपायी (३) जन्मोजन्मी ऐसा सद्‍गुरु मिळावा। भक्त मेळा ऐसा सदा सजावा (४) आणि शेवटी घाली पंखाखाली सद्‍गुरु माऊली ही प्रार्थना करून त्या दिवसाची सांगता झाली. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव

संपन्न झाला.

बुधवार दि. ८.३.२०२३ (फाल्गुन वद्य द्वितीया)ला श्री तुकाराम बीज होती. संत तुकाराम महाराजांचा पुण्यतिथी दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले. सर्वांनी भावपूर्ण पदें म्हटली.

सोमवार दि. १३.३.२०२३ (फाल्गुन वद्य षष्ठी) ला श्री एकनाथ महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रातः स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठान चरित्र वाचन समाप्ती झाली. नंतर सद्‌गुरु श्री दादाभाईंच्या ध्वनिमुद्रित प्रवचनाचे श्रवण उत्सव समाप्ती झाली. आम्हा अज्ञ बालकांची सेवा सद्‌गुरुंनी मान्य करून कृपादृष्टि असूद्यावी अशी कळकळीची प्रार्थना करण्यात आली.

**- इति -**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः।।

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

**७.१२.१९३०**

**श्री गणेशाची आरती**

**''जय देव, जय देव, ॐकारा गणराया,**
**जय सद्गुरुराया।**
**आरती ओवाळू तुज विघ्नें हराया।।धृ.।।.....''**

''राजा परिक्षिती एक्या श्रवणें वैकुंठा नेला।।''

एका श्रवणाच्या योगे परिक्षितीची अंतःकरण शुद्धि होऊन, ज्ञान प्राप्त होऊन, चित्तचैतन्य होऊन सात दिवसात तो वैकुंठास गेला. तसेंच :-

''नारद कीर्तन भक्तीनें तो पूर्णत्वा आला।।''

नारदाने एका कीर्तन भक्तिशिवाय आणखी काही केले नाही. हातात विणा घेऊन तोंडाने ''नारायण, नारायण'' असे म्हणत त्यांनी त्रिभुवनात फिरावे. पण योग्यता किती! नारद सर्वांना देवांना, दानवांना व मनुष्यांना वंद्य होते. ''आपुला विसर पडो नेदीं'', ह्या विषयीं तर प्रल्हादाने स्मरण भक्तीची कमालच केली.

''प्रल्हादाच्या स्मरणें नृहरीमूर्ती गुरगुरली।।''

हिरण्यकश्यपूने प्रल्हादाचा अतिशय छळ केला. मुलाने ईश्वर भक्ती करू नये म्हणून नाना तऱ्हेने त्रास दिला. डोंगरावरून कडेलोट केला, कडकडीत तेलाच्या कढईत लोटला व त्याच्या प्रत्यक्ष आईकडून त्याल विष देवविले, परंतु अशा प्रसंगी ही तो नामस्मरण करण्यास चुकला नाही. शेवटी हिरण्यकश्यपूचा त्याच्या पुढे काही उपाय चालेना, तेव्हा अतिशय कोपाविष्ट होऊन त्याने मुलाला विचारले की, ''तुझा नारायण आहे तरी कोठे?'' :- ''असे कोठे तो रे। तुज बहुत ज्याचे भरवंसे।।'' त्यावर प्रल्हाद म्हणाला की :- ''वसे सर्वां ठायीं स्थिरचर पटीं तंतु गवसे।।'' तेव्हा हिरण्यकश्यपूने विचारले, ''ह्या खांबांत आहे काय?'' :- ''दिसेना का स्तंभी?'' ''मज दिसतसे तो नरहरी।।'' प्रल्हादाने ''असे स्तंभी'' असे म्हणता क्षणीच त्या दुष्टाने त्या खांबावर लाथ मारली तोच त्या स्तंभामधून कडकड असा आवाज होऊन ''प्रगट होय असा नर केसरी।।'' सांगण्याचे तात्पर्य हे की, स्मरण भक्तीच्या योगाने जर भगवान जड खांबांतून प्रगट झाला, तर तो आमचा हृदयांत का प्रगट होणार नाही?

असो. आता आपला ‘‘विसर नामाचा पडो नेंदी।।’’ ह्या आपल्या मुद्याकडे वळू ‘‘विसर’’ ह्या शब्दाने तुकाराम महाराजांनी ‘‘पराभक्ति–गुरुदेव भक्ति’’ सुचविली आहे. सनत्कुमाराप्रमाणें जर ‘‘एकांत भक्ती’’ मागितली, तर नुसते अन्वय व्यतिरेक ज्ञान पदरात पडेल :– ‘‘एकांत भक्तिर्हि गोविंदे यत्सर्वत्र तरीक्षणं।।’’ म्हणून तुकाराम महाराजांनी ‘‘विसर पडो नेंदी।।’’ ह्या चरणात मोठ्या युक्तीने सर्वात्म भक्ति मागितली आहे.

ह्या अभंगांत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे :– ‘‘ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर।।’’ ह्या चरणात तुकाराम महाराजांनी अगदी कमाल करून सोडली आहे. त्यांना अन्वय ज्ञान इतके बाणले होते की त्यांना व्यतिरेक ज्ञानाची पर्वाच वाटत नव्हती. ज्याप्रमाणे बी.ए.च्या परीक्षेस जाणारा विद्यार्थी मॅट्रीक्युलेशन परीक्षेच्या अभ्यासाची पर्वा करीत नाही. त्याप्रमाणे तुकाराम महाराजांची स्थिती होती. तसेच जेव्हा भगवंताने अर्जुनाला विचारले की :–

‘‘कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेणचेतसा।
कच्चिदज्ञानसंमोहः प्रणष्टस्ते धनंजय।।’’ (भ.गी. १८/७२)

तेव्हा अर्जुन आपल्या अन्वय ज्ञानात इतका तल्लीन झाला होता की, श्रीकृष्णाने कोणत्या क्रमाने प्रश्न केला आहे व त्याचे उत्तर प्रश्नाच्या अनुरोधाने द्यावयाचे भान न राहून त्याने, पहिल्याने आपला अन्वय ज्ञानाचा अनुभव व्यक्त केला :– ‘‘नष्टो मोहः।।’’, माझा मोह व त्यामुळे दिसणारे आकार नाहीसे झाले. इतके

त्याला अन्वय ज्ञानाचे महत्त्व वाटत होते. आपल्या अन्वय ज्ञानाचे तुकाराम महाराजांना ही तितकेच महत्त्व वाटत होते व त्यांनी आपल्याला अनुभव आमच्या कल्याणाकरिता नमूद करून ठेविला आहे.

आता आणखी एक मुद्दा राहिला आहे. त्याचा आपण विचार करू. सनत्कुमारांची, उद्धवाची, अर्जुनाची, श्री तुकाराम महाराजादि संतांची पूर्ण स्थिती लवकर बाणली. परिक्षितीची सात दिवसात बाणली, अर्जुनाची व उद्धवाची तर एका बैठकीत बाणली असे असून आमची स्थिती त्यांच्याप्रमाणे का होत नाही? याचे कारण असे आहे की आमचे श्रवण वर वर होत असते, तीव्र उत्कंठतनेने होत नाही. ज्याप्रमाणे जर खरजेला नुसते वर वर औषध लाविले, तर ती बरी होण्याला वेळ लागेल. पण जर तिच्या खरपुड्या काढून जर औषध लाविले तर ते बरेच झोंबते, पण ते लवकर बरी होईल. तद्वत् आमच्या अंतःकरणात खरूजरूपी कुत्सित कामना दटून राहिल्या आहेत. त्यांच्यावर आम्ही श्रवणरूपी औषध वर वर लावतो. म्हणून श्रवणरूपी औषधाचा व्हावा तसा उपयोग होत नाही. नावर वर वर घेऊन पाप जाणार नाही. तर पाप अगर कुत्सित कामना शोधून तिच्यावर नामाग्नि टाकिला पाहिजे :-

''हुडकुनी अशी कुत्सित कामना। तिजवरी हरिनाम हुताशना।।

जरि अमंगळ चित्त ही घालिती। सकळ पातक बीज ही जाळिती।।''

नाम घेताना देवाजवळ प्रांजळपणे आपले दुर्गण सांगावे. त्याच्यापुढे आड पडदा ठेवू नये. ख्रिस्ती धर्मांत ह्या कृतीला पापे कबूल करणे. पापांचा पाढा वाचणे असे म्हणतात. देवाजवळ जो आपले दुर्गुण व्यक्त करितो, तो दोषमुक्त होतो. आपण दुसऱ्यांचे गुण दोष पहातो व आपल्या दुर्गुणांवर पांघरूण घालतो. ह्यासाठी श्रीकृष्णाने उद्धवाला बजावून सांगितले की :- ''आदरे सांगे श्रीकृष्ण। उद्धवान देवावे गुण दोष। हे माझे जीवीची निजखूण। तुज म्यां संपूर्ण सांगितली।।'' सर्वांना भगवद्रूप ह्या भावनाने पहावे, व आपल्या अंतःकरणात ज्या काही कुत्सित भावना असतील, त्यांची विदारणा देवाजवळ करावी. सेंट पॉल हा एक ईश्वराचा परम भक्त होता. तो आपल्या दोषांचा ईश्वराजवळ नेहमी पाढा वाचीत असे. देव त्याला म्हणत असे, ''बरे आहे, ते असू दे'' सारांश आपण आपले दोष देवाला सांगतच असावे. मग ते देवाने नाही काढले तरी चालतील. सेंट पॉल प्रमाणे तुकाराम महाराज आपले दोष देवापुढे प्रांजळपणे मांडतात :- ''माझे मज कळो येती अवगुण। काय करू मन अनावर।। आता आज उभा राहे नारायणा। दया सिंधुपणा साच करी।। वाचा वदे परी करणे कठीण। इंद्रिया आधीन झालो देवा।। तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास। न धरीं पदास मायबापा।।''

नामदेवांनी ही ह्याचप्रमाणे आपले दोष देवापुढे स्पष्टपणे व्यक्त केले आहेत :-

''अमृताहूनि गोड नाम तुझे देवा। मन माझे केशवां कां बा

नेघे।।

सांगा पंढरीराया काय करूंयासी। का रूप ध्यानासी न ये तुझे।।

कीर्तनी बैसता निद्रे नागविले। मन माझें गुंतले विषय सुखा।।

हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ती। नये माझ्या चित्तीं नामा म्हणे।।''

ह्या दोन प्रार्थनेवरून असे सिद्ध होते की नुसते नाम घेऊन पातकांचा अगर गुणदोषांचा नाश होणार नाही. तर आपले जेवढे अवगुण असतील तेवढे देवाच्या पुढे ठेवून त्याची अनुतापपूर्वक प्रार्थना केली असता पातकाचे क्षालन होऊन अंतःकरण गंगाजळासारखे निर्मळ होईल आणि अर्जुनाला, उद्धवाला, परिक्षितीला व प्रल्हादाला जो गुण श्रवणद्वारें, स्मरणद्वारे अगर नामस्मरणाने आला, तोच गुण आपणालाही थोड्याच अवधीत येईल. आणि अशाप्रकारे जर श्रवण होत नसेल, तर ते ऐकून न ऐकण्यासारखेच. ते ह्या कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देण्यासारखे आहे.

आता ''ध्यानी रूप वाचे नाम निरंतर।।'' ह्या चरणात प्रतिपादन केलेला मुद्दा लक्षात ठेवण्यासारखा आहे. उदाहरणार्थ ज्या शस्त्राने एखादी शस्त्रक्रिया करावयाची असेल, ते शस्त्र अति तीक्ष्ण धारीचे असून ते अतिस्वच्छ असले पाहिजे, म्हणून शस्त्रक्रिया करण्यापूर्वी शस्त्रवैद्य ते शस्त्र पहिल्याने उकळत्या पाण्यात काही औषधी द्रव्य घालून त्यात ठेवतात म्हणजे तेणेकरून

ते शस्त्र स्वच्छ होते इतकेच नाही तर त्यावर असलेले एखाद्या रोगाच्या जंतूंचा ही समूळ नाश होतो, नाही तर गुण येण्यासाठी अस्वच्छ शस्त्राने शस्त्रक्रिया केली तर गुण येण्याचे एकीकडेच राहून शस्त्राच्या द्वारे एखाद्या रोगाचे जंतू रक्तात जाऊन रक्त दूषित होऊन रोगी प्राणास मुकण्याचा संभव आहे. तद्वत दोष गुण न जाता नाम घेतले, व वृत्ती स्वरूपाकार केली नाही, आणि सर्व जग भगवद्रूप पाहण्याची सवयी केली नाही, तर विषय घेऊन टाकतील, व विषयांचे विष बाधून मुमुक्षू अगर साधक प्राणास मुकेल, म्हणून फार सावधगिरीने प्रपंच व परमार्थ करावा, मनाला विषयांचा ओढा असतो. त्यामुळे ते नजर चुकवून विषयावर उडी घालील, म्हणून साधकाने त्याला मोठ्या कुशलतेने विषयांपासून मागे फिरवावे :-

''सावध सावध हो रे, तूं येरे मना। सावध सावध होई रे।।ध्रृ.।।

सावध तूं होसी जरी, परब्रह्म नाही उरी। पावशील आनंदा घरी रे।।

आदी गोज अंती दुःख विख रांधिलें पियुख। तैसे विषयांचे सुख रे।।

उपजणे मरणे चौऱ्यांशीचे फेरे घेणे। हे तो नव्हे भले जिणे रे।।''

अशा रितीने मनाला विषयांतून काढून स्वरूपाकडे लावणे ह्याला प्रत्याहार म्हणतात :- ''विक्षेपाचा नाश कराया प्रत्याहार

करा।।'' विषयाला चिकटून राहिले तर कधीच सुटका होणार नाही. निर्विषय झाल्याशिवाय मुक्ति कधीच मिळणार नाही, मग तो ज्ञानी असो अगर अज्ञानी असो :- ''मग काय ते समयीं उरे। अंतर ज्ञानिया अज्ञानियास।।'' थोडीशी जरी विषय वासना असेल, तरी तो फुकट मोहाला बळी पडेल व जन्म मरणाच्या रहाटगाड्यात सापडेल, याकरिता सोहिरोबाप्रमाणे भगवंताची अशी प्रार्थना नेहमी करावी:- ''ऐशी करी रे दया। परतोनी मन न धरी या देहाची माया।।''

तुकाराम महाराज देवाला सांगतात, ''देवा! मी प्रत्याहार बित्याहार काही जाणत नाही.'', ''ध्यानी रूप वाचे नाम निरंतर।।'' हेही माझ्याकडून होणार नाही. ''आपुला विसर पडो नेदीं।।'' हेही मला साधणार नाही. देवा! हे सर्व माझ्या करिता तूच कर. ''आपुला विसर पडो नेदीं।।'' ह्यात काय माधुर्य आहे, हे तुकाराम महाराजांनीच जाणले, व त्याची आम्हाला कल्पना करिता यावी म्हणून त्यांनी एक समर्थक दृष्टांत दिला आहे :- ''मायबाळा भेटी सुखाची आवडी। तैसी मज गोडी देई देवा।।'' ह्या चरणात परब्रह्माचे अनिर्वचनीय स्वरूप ''मान्य'' ह्या शब्दाने व भक्ताची शुद्ध सत्त्वगुणीवृत्ती ''बाळ'' या शब्दाने प्रदर्शित केली आहे. ज्याप्रमाणे आईच्या भेटीने चुकलेल्या बाळकास अत्यंत आनंद होतो, तसा सतत आनंद तुझ्या सगुण रूपाच्या दर्शनाने मला दे. तुकाराम महाराजांनी हा जो आईचा दृष्टांत दिला आहे, तो फार मार्मिक आहे, कारण आईचे प्रेम

जसे निष्काम, निष्कपट असते, तसे बापाचे नसते. मुलगा सद्गुणी असेल, तरच तो त्याच्यावर प्रेम करील. पण जर तो दुर्गुणी असेल, तर तो त्याचे तोंडही पाहाणार नाही. परंतु आईचे प्रेम असे नसते. मुलगा जरी वाईट असला, तरी त्याच्यावर तिचे प्रेम कायम असतेच. इतकेच नाही तर वाईट मुलावर तिचे विशेष प्रेम असते. म्हणून सर्व संतांनी ईश्वराला ''आई'', ''माय'' याच अभिमानाने आळविले आहे :- ''विठो माऊलीये हाचि वर देई। संच रोनी राहीं हृदया माजी।।'', ''नामा म्हणे माझे सांवळे विठोई। संच रोनी राहीं हृदयामाजी।।'' तुकामाम महाराजांचे हे म्हणणे विठोबाने ऐकून घेतले व त्याचा राग शांत झाला. पुढे विठोबाने त्यांना विचारले की, ''अरे, तू माझ्याकडेच का येतोस? दुसऱ्या कोणाकडे का जात नाहीस?'' त्यावर तुकाराम महाराज उत्तर देतात :- ''कीर्ती ऐकोनिया जालों शरणागत। दासाचें तू हीत करतोसी।।'' ''देवा! मी उगीच तुझ्या द्वारीं आलो नाही, तर वेदशास्त्र, पुराणांवर पूर्ण विश्वास ठेवूनच मी तुझ्याकडे आलो आहे.'' तुझी कीर्ती अशी आहे :- ''न मे भक्तः प्रणश्यति।।''

''नाम घेतां वायां गेला। ऐसा कोणी आइकिला।।
सांगा विनवितों तुम्हांसी। संत महंत सिद्ध ऋषी।।
नामें तरला नाहीं कोणी। ऐसा द्यावा निवडूनी।।
सलगीच्या उत्तरा। तुका म्हणे क्षमा करा।।''

देवा! अशी तुझी कीर्ती ऐकून मी तुला शरण आलो आहे.

अशी जी तुझी बिरूदावळी आहे ती आता सत्य कर अशी मी तुझी प्रार्थना करितो, देवा! तू म्हणशील की सनत्कुमारांनी माझ्या सांगण्याप्रमाणे केले आणि आपले ध्येय साध्य करून घतले, तसे तू ही कर. अर्जुनाकडे पहा, उद्धवाकडे पहा, कशी त्याने माझ्याजवळ मुक्ति वरची भक्ती मागितली, व त्याप्रमाणे आचरण करून जगात आपली ख्याति करून घेतली :- ''तिहीं मागितली निज मुक्ति। उद्धवें थोर केली ख्याति। मुक्तिचे माथां वाहिली भक्ति। अगम्य स्थिती हे श्रीपती अर्पित।।'' ह्यावर तुकाराम महाराज म्हणतात :- ''संत सनकादिक हे तर सत्त्वाचे सागर होते, धैर्याचे केवळ पर्वतच होते. त्यांच्या अंगी तपश्चर्येचे बळ होते, तेव्हा त्यांच्याशी माझी तुलना कशी करिता येईल. मी बोलून चालून हीन, दुर्बळ, दुराचारी आहे :-''तुका म्हणे मी तो हीन पाप राशी। घालावे पाठीशी मायबापा।।'' तेव्हा देवा! माझी पूर्णता तुलाच केली पाहिजे, कारण तुझ्या राज्यात सर्वांना सारखाच न्याय मिळतो अशी तुझी कीर्ती मी ऐकिली आहे. मग तू मला पारखा का लेखतोस :- ''तू ते सर्व सारखे । प्रल्हाद उद्धवासारिखे। लघु जाणोनी मजला पारखे। कैसे करीती।।'' तू समदर्शी असून कल्पवृक्ष स्वभावाचा आहेस, म्हणून देवा! आता विलंब लावू नकोस, एवढेच माझे तुझ्या पायाजवळ मागणे आहे :-

''धाव दयाळा सद्गुरुनाथा। का लपसी तू परम समर्था।।''

देवा! तू दयाळू असून समर्थ आहेस. काही दयाळू असतात,

परंतु दुसऱ्याचे दुःख निवारण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी नसते, त्यामुळे त्यांच्या दयाळूत्वाचा गुण असून नसून सारखाच. काही समर्थ असतात, पण त्यांच्या अंगी भूतदया नसल्यामुळे त्यांच्या सामर्थ्याचा काही उपयोग होत नाही. पण देवा! तुझे तसे नाही. तू दयाळू असून समर्थ आहेस. नुसता समर्थ आहेस असे नाही, तर परम समर्थ आहेस. ''कर्तुमकर्तुमन्यथाकर्तु'' असे सामर्थ्य तुझ्या अंगी आहे, म्हणून मी तुझी विनवणी करितो की, ''धांव दयाळा परम समर्था'' देवा! माझ्या संकटाचे निवारण करण्यास तू चालत येऊ नकोस, तर धावत ये.''

''पातक संचय फार असे परी। भस्मची करिसी तूं बलवंता।।''

देवा! मी इंद्रियांच्या द्वारे विषय सेवन केले, त्यामुळे मी इतका पापी बनलो. विषय भगवद्रूप आहेत ह्या भावनेने मी घेतले नाहीत, त्यामुळे पातकांच्या राशी खाली मी अगदी दडपून गेलो आहे. आता जर तुझी कृपादृष्टि माझ्यावर पडेल, तर माझ्या पातकांचे क्षणार्धात भस्म होऊन जाईल. आता तुझ्याकडेच मी का आलो ह्याचे कारण असे आहे की :-

''बिरुदें ऐकूनि आलों शहण मी। नको लावू तूं उशीर आता।।''

वाल्याकोळी, अजामीळ वगैरे शेकडो पापी, दुराचारी लोकांचा तू उद्धार केलास म्हणून मी तुझा धावा करितो, तर आता उशीर न लावता तू माझा उद्धार कर.

''सम सदस्य तूं कल्पतरू कीं। पूर्ण करिसी मम मनोरथा।।''

देवा! तू ''सम, सदय'' व ''कल्पवृक्षाच्या स्वभावाचा आहेस. लहान मुलाला आई दिसली की जसे त्याला आनंदाचे भरते येते, तसे देवा! तुला चराचराच्या ठिकाणी पाहून आनंद भोगावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. हा माझा मनोरथ पूर्ण कर एवढीच माझी तुझ्या पायापाशी विनंती आहे. ह्या पदात आणि तुकाराम महाराजांच्या ''एकांतीचे सुख देई मज देवा।।'' ह्या अभंगात बरेच साम्य आहे. त्या अभंगात जे विचार ध्वनित केले आहेत, तेच विचार ह्या पदात आले आहेत.

ज्यावेळी साधकाची वृत्ती काही कारणामुळे स्वरूपात जात नसेल त्यावेळी ह्या पदाचा अगर अभंगाचा अवश्य उपयोग करावा, कारण साधक दशेत असताना ह्या पदाधारे उत्तम गुण आला होता, आणि आताही येईल असे मानण्यास सबळ पुरावा आहे. तेव्हा जो साधक श्रद्धायुक्त अंतःकरणाने व कळवळ्याने सद्गुरुचा धावा करील त्याला ही गुण येईल. अर्थात् त्याची वृत्ती स्वरूपात मोठ्या आनंदाने जाईल :- ''सुखेन ब्रह्म संस्पर्शमत्यंतं सुख मश्नुचे।।''

**: नारायण :**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः।।

# श्री सद्‌गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

**रविवार : २.५.४३**
**सकाळी : ८.५० ते ९.५०**

**राम म्हणे ग्रासोग्रासी। तोंचि जेविला उपवासी।।१।।**
**धन्य धन्य ते शरीर। तीर्थाव्रतांचे माहेर।।२।।**

असे रामनाम घेणारा नित्यमुक्त असतो त्याचे हे शरीर म्हणजे तीर्थाव्रतांचे माहेर आहे. तीर्थे ही संताच्या येण्याची वाट पाहात असतात. कारण ती सर्व लोकांची पातके घेऊन त्यांना पूनीत करते पण हा त्यांचा पातकांचा बोजा डोईजड झाला म्हणजे ती संतांना प्रार्थना करतात की, तुमच्याशिवाय आमचे हे ओझे कोण हलके करणार? म्हणून संत हे त्यांना जरूर नसताना

यात्रेला जातात. ते स्वतःच्या कल्याणासाठी नाही तर तीर्थांना पावन करण्यासाठी ते तर कल्याणरुपच असतात. (जगाच्या कल्याण संतांच्या विभुती)

**राम म्हणे वाट चाली। यज्ञ पाऊला पाऊली।।३।।**
**राम म्हणे करितां धंदा। सुख समाधी ते सदा।।४।।**

कोणतेही संत प्रपंच सोडायला सांगत नाही.

**धंदा न सुटे जरी। सुखें असा व्यापारी।।**
**वाचे आणि अंतरी। आठवा राम।।** (वामन पंडित)

एका डॉक्टरने विचारले जर ऑपरेशन करताना रामनाम घेतले तर आमचे लक्ष तिकडे जाणार नाही मग आमचा धंदा कसा होणार? मी विचारले ऑपरेशन करताना फक्त त्याकडेच किती डॉक्टरचे लक्ष असते? क्लोराफार्म बरोबर दिला ना? ऑपरेशन नीट होणार की नाही? इ. विचारांचे डोक्यात काहूर माजलेले असते. पण जर भगवंताचे नाम घेतले तर हा Steady राहिल nervousness जाईल.

**राम म्हणजे भोगी त्यागी। कर्म न लिंपे त्या अंगी।।५।।**
**ऐसा जपे राम नित्य। तुका म्हणे जीवन्मुक्त।।६।।**

आमच्याकडे सर्व मुले Programe मध्ये भाग घेऊन शाळेत वर नंबर घेतात. मेडिकल कॉलेजचा एक विद्यार्थी तर सांगतो की मी जर परमार्थाला लागलो नसतो तर मी यंदा पास झालो नसतो. त्याचे वडील वारल्यामुळे त्याला Shock बसला होता. कारण घरची सर्व जबाबदारी त्यांच्यावर पडली होती. मी त्याला भेटायला गेलो होतो. त्याला सांगितले तुझे वडील म्हणजे ते शरीर का? मग तू त्यांना जाळलेस तेव्हा पितृहत्येचा तुला दोष

लागेल. शरीर वडील नाहीत तर आत्मा वडील आहेत सर्वांचा आत्मा एकच. मग त्या आत्मरूपाने ते तुझ्या हृदयात निरंतर वास करतात. पूर्वी तरी निराळे होते. पहा ह्याचा विचार कर. त्याने तेथेच जरा विचार केला व सर्व सोडून दिले व पूर्वीप्रमाणे तो राहू लागला व परीक्षेत उत्तमप्रकारे पास झाला. तेव्हा भावनेवर आहे. रा. वासुदेवराव खासनीस ह्यांची मातोश्री गेली त्यावेळी मी गेलो होतो. मी सांगितले death नाहीच. तेव्हा समोर dead body असताना ५ मि. सर्वांची भावना झाली की death नाहीच वास्तविक death सुखाचा आहे पण पुढचा तो देखावाच भयंकर आहे. आता वियोगदुःख होतेच पण तो आत्मा ह्या देहरुपी पिंजऱ्यातून सुटल्यामुळे आनंदी होतो. तात्पर्य मानले तर आहे नाहीतर काही नाही. आपण तर ह्यादेहाचा विसर पडावा म्हणून प्रयत्न करतो. श्री तुकाराम महाराजही तशीच प्रार्थना करतात.

**देवा आता ऐसा करी उपकार। देहाचा विसर पाडी मज।।१।।**

ह्या देहामुळे जो त्रास होतो तो थोडाफार हलका व्हावा म्हणून कित्येक दारू पितात. आम्ही त्यांना बोलतो खरे पण त्याबद्दल जर मोबदला दिला नाही तर ते तरी कसे सोडणार? श्रीमोरोपंतांनी मद्यपी व निजमद्यपी ह्यांची सुंदररीतीने तुलना केली आहे.

**देहाते विसरे, न मृत्युस गणी, हांसे ही, नाचे रडे।**
**लज्जा जाय नुरेंचि रीति पहिली, अन्याची अंगी जडे।**
**हे पान व्यसनी असे सुख तरी ते कीर्तीपानी घडे।**
**पायीं विश्व पडे न जाय नरकी। का मद्यप्यां नावडे?।।**

दारू पिणाऱ्यांना जे गुण तेच निजमद्यप्यात आहे. पण तिकडे देहभावना जाते खरी पण सर्वात छीथू होते, कुटुंबाचा, पैशाचा नाश होतो व येथे कीर्तनकार म्हणून सर्व पाया पडतात, स्वतः सुखी होतो व जगालाही सुखी करतो. असो पण ह्या मद्यपानावर नुसते व्याख्यान देऊन काय उपयोग? त्याला ही गोडी दिली पाहिजे. आमच्याकडे एक अट्टलदारू पिणारा आला होता. तेव्हा ह्याच विषयांवर भाषण नेहमी व्हावयाचे त्याचा परिणाम असा झाला की पुढे त्याने अजिबात दारू सोडून दिली. नामपानाचे एकदा व्यसन लागले की इतर व्यसने आपोआप सुटतात म्हणून भगवान म्हणतात :-

**अपिचेत्सुदुराचारो भजे मामनन्यभाक्।**
**साधुरेव स मंतव्य सम्यग व्यवसितो हिसः।।**
**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांती निगच्छती।**
**कौंतेय प्रजिजानीही न मे भक्तः प्रणश्यति।।** (भ.गी.)

सर्व गीतेत मला हा श्लोक आवडतो कितीही वाईट मनुष्य असला तरी त्याला येथे आधार आहे. समर्थांच्या शिष्यात एक उत्तम कीर्तनकार होता पण तो जरा बाहेरख्याली होता. सर्व लोक त्याला तेथून घालविण्यासाठी प्रयत्न करू लागले. पण समर्थांना हे कळले तेव्हा ते म्हणाले तुमच्या सर्वात तोच उत्तम होईल. समर्थांना त्याचे कीर्तन फार आवडत असे. एक दिवस त्यांनी त्याला करायला सांगितले तेव्हा शेवटी त्याने कळवळ्याने मागितले की मी अर्धांगाने चांगला आहे. पण दुसरे अर्धांग इतके वाईट आहे की त्यायोगे मी आपल्याजवळ येण्यास अधिकारी नाही. समर्थ म्हणाले की तुला एक जन्म घ्यावा

लागेल. पण तो म्हणाला की मग आपले चरण धरण्याचा काय उपयोग? तेव्हा समर्थांनी त्याला क्षमा केली व

**संतचि फळती नमोऽस्तुते म्हणतां**

सर्वांग सुंदर केले श्रीराम. परमहंसाकडे असाच एक कीर्तनकार बाहेरख्याली होता. लोक तर श्री. रा. परमहंसांना म्हणत की तो तुमच्यापेक्षा जास्त परिणाम करतो. म्हणून एक दिवस ते स्वतः कीर्तनाला गेले व त्याला एका बाजूला घेऊन म्हणाले की अरे येथे गप्पा सांगतोस व तिकडे शेण खातोस ना? तो म्हणाला केरसुणी ही वाईट आहे खरी पण उठल्याबरोबर तीच लागते. सर्व घाण ती साफ करते. त्याप्रमाणे येथे मी सर्वांची अंतःकरणे साफ करतो व मग तिकडे कोपऱ्यात जाऊन पडतो. श्रीरा. परमहंस म्हणाले जा. तू 'अपिचेत्सुदुराचारो' ह्या क्लासातला आहे. तात्पर्य Greatest sinner is the greatest Saint. कारण सत्संगतीत त्याची बुद्धि थोड्याच काळात धर्मरूप होते. भगवान म्हणतात की भक्त हे माझे नाक आहे. ते मी कधीही कापू देणार नाही. भक्ताचा नाश झाला तर मला ते दूषण आहे. तो कसाही असला तरी त्याचे सर्व दोष जाऊन तो परम भक्तच होईल. असो. ही भक्ति थोर करून सांगण्याची भगवंताची आम्हाला आज्ञा आहे. म्हणून आम्ही भजन सोडून भक्ति निरुपण करतो. एका Life मध्ये एक मनुष्य जरी ह्या मार्गात आणून त्याला ही गोडी पूर्ण दिली तर भगवान प्रसन्न होतो. येथे तर कितीतरी जणांना ही गोडी मिळते. श्री वामन पंडित म्हणतात ह्या भक्तिनिरुपणासाठीच मी गीता लिहिली. तेव्हा ह्या निरुपणाने अनेक जडजीवांचा उद्धार होतो. पण संत हे आपले भाषण आहे

असे advertise करीत नाहीत कारण त्यात मुमुक्षुची जिज्ञासु दिसून येते. साखरेकडे मुंग्याच धाव घेतात ती त्यांना बोलवत नाही. त्याप्रमाणे जेथे निरुपण असते तेथे भक्त धावत जातात. अशी ज्याला गोडी आहे तोच परमार्थ उत्तम करील. समर्थ ह्याचसाठी सज्जनगडावर जाऊन बसत की पाहू या कोण कोण एवढा त्रास घेऊन येतात? पण बहुतेक भक्त जात. ही आवड असली की मग ते काही पाहात नाही.

**न लाज तीन लोककी, न बेदको कह्यो करे।**
**न शंख भूतप्रेतकी न देव यक्ष ते डरे।**
**सुनेन कान और की द्रसैन और इच्छना।**
**कहे न मुख और बात भक्ति प्रेमलच्छना।। (सुंदरदास)**

जारिणी ही जाराकडे जाताना सर्व लज्जा, भीती सोडून त्याकडे जाते त्याप्रमाणे भक्त हे सर्व लज्जा टाकून, त्रास सोसून संताकडे जातात. समर्थोंच शिष्य दररोज गडावर जात असा Sacrifice करण्यास जे तयार होतील तेच पुढे जगचाचे कल्याण करू शकतील.

◈◈◈

## : विशेष अहवाल :

नमस्ते भक्तगणहो!

श्री दत्तगुरुंचे भक्त कुठवर पसरलेत असा प्रश्न कुणी विचारल्यास संपूर्ण भारतभर असे उत्तर पटकन येईल.

भारताबाहेर देखील आहेत, पण ते मूळचे भारतीय आहेत.

मात्र एखादी कझागस्तानची महिला (मूळची रशियन) श्री दत्तगुरुंची भक्त आहे आणि तिने भारतात येऊन नाशिक येथील श्रीक्षेत्र दत्तधाम पीठ, गोवर्धन ह्या सुप्रसिद्ध पवित्र स्थळी तेथील महान दत्तभक्त प.पु. श्री दत्तदास महाराज ह्यांच्याकडून दत्तदीक्षा घेतली आहे आणि दत्तभक्तीचा प्रसार ती युरोपमध्ये विशेषतः कझागस्थान आणि आजूबाजूचे देश येथे करीत आहे असे कुणी सांगितल्यास आश्चर्य वाटेल.

त्यातही ही रशियन महिला अलीकडेच आपल्या सद्भक्ती मंदिरात येऊन दर्शन घेऊन, ध्यान करून कृतार्थ होऊन गेली असे सांगितल्यास परम आश्चर्य वाटेल.

हो, पण हे खरोखरच घडले. सोमवार दि. २४ एप्रिल रोजी सौ. नताल्या वोरोबीवा ह्या कझागस्थानी महिला श्री प्रशांत काशिनाथ गीते आणि त्यांचा परिवार ह्यांच्यासह सद्भक्ती मंदिरात पदार्पण करित्या झाल्या.

आता थोडे ह्या श्री. प्रशांत गीते ह्यांचे विषयी. हे एक पंचगव्य चिकित्सक आहेत. समाज कार्यकर्ता आहेत. आणि मुख्य म्हणजे टिटवाळा ह्या पवित्र स्थानी स्थायिक झालेले वेदविज्ञानप्रवर्तक श्री. विश्वास लक्ष्मण साक्रीकर, जे आपल्या प.पु. निरंजन रघुनाथांच्या परंपरेतील एक महान गुरुभक्त आहेत. त्यांचे अनुग्रहित आहेत. समाजसेवेच्या कार्यात ते पारंपारिक शस्त्रविद्या, धनुर्विद्या इत्यादींचे मार्गदर्शन करतात.

योगायोग हा की ह्याच महिन्यात मंगळवार दि. ११ एप्रिल २०२३ रोजी प.पू. श्री साक्रीकर महाराज त्यांच्या पत्नी आणि शिष्य परिवारासहित

आपल्या सद्भक्ती मंदिरात येऊन श्री दत्तदर्शन घेऊन आम्हा भक्तगणांना काही महत्त्वाच्या विशेष गोष्टींविषयी मार्गदर्शन करून टिटवाळा येथे प्रस्थान करते झाले.

ह्या प.पू. श्री साक्रीकर महाराजांनी सौ. नताल्या ह्यांना जोगेश्वरी येथील सद्भक्ती मंदिरात जाऊन श्री दत्तगुरुंचे आणि श्री दत्तपादुकांचे जरूर दर्शन घ्यावे अशी सूचना दिली.

सौ. नताल्या ह्यांनी ही गुरुआज्ञा समजून लगेचच सद्भक्ती मंदिरास भेट दिली. दर्शन घेऊन जवळ जवळ अर्धा तास त्यांनी ध्यान केले. मंदिरात प्रवेश केल्याबरोबर त्यांना येथील त्या दिव्य शक्तीची जाणीव व्हायला लागली होती आणि त्यांचे ध्यान संपल्यानंतर तर त्या अत्यंत सद्गदित होऊन अश्रूपूर्ण अवस्थेत हे एक अद्भूत स्थान आहे, येथे येणे हे अत्यंत भाग्यशाली आहे. अशा आशयाचे उद्गार त्या वारंवार काढीत होत्या. अर्थातच त्यांचे आमचे संभाषण इंग्रजीतून चालू होते.

सौ. नताल्या ह्यांनी पूर्वी गुर्वाज्ञेने काशी क्षेत्री जाऊन श्री काशीविश्वेश्वराचे दर्शन घेतले होते. येथे सद्भक्ती मंदिरात तशाच दिव्यशक्तीचा अनुभव येतोय असेही त्या म्हणाल्या.

निरोप घेताना तर त्या फारच भावविवश झाल्या होत्या आणि आपल्या पुढील भारत दौऱ्यात सद्भक्ती मंदिरात अधिक वेळ देणार असे सांगून त्यांनी निरोप घेतला.

हे असे सर्व सविस्तर दिले आहे, कारण मा. प्रशांत गीते ह्यांनी आपल्या ग्रूपवर ह्या संबंधी प्रथम पोस्ट टाकली आणि आपल्या वामन दादाने सौ. नताल्या ह्यांच्या भेटीविषयी आनंद व्यक्त केला होता. त्यानंतर सौ. नताल्या ह्यांच्या विषयी सविस्तर माहिती मिळावी अशी इच्छा अनेक भक्तांनी केली होती. त्यांचा मान राखून हे सर्व लिहित आहे.

✦✦✦

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः।।

# चैत्र, वैशाख, ज्येष्ठ (एप्रिल ते जून) महिन्यातील उत्सव व महोत्सव

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. ६.४.२०२३ (चैत्र पौर्णिमा) | श्री हनुमान जयंती. सकाळी ६.३० वाजता जन्मोत्सव. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक. |
| मंगळवार | दि. १८.४.२०२३ (चैत्र वद्य त्रयोदशी) | श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी दिन. |
| गुरुवार | दि. २०.४.२०२३ (चैत्र अमावस्या) | सद्‌गुरु श्री पार्वतीमाता जयंती दिन. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन. |

**वैशाख मास :**

***श्री वामन पंडित पुण्यतिथ्योत्सव***

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. २२.४.२०२३ (वैशाख शुद्ध तृतीया) | अक्षय तृतीया व श्री परशुराम जयंती. सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ. |
| मंगळवार | दि. २५.४.२०२३ (वैशाख शुद्ध पंचमी) | श्री आद्य शंकराचार्य जयंती. |
| बुधवार | दि. २६.४.२०२३ (वैशाख शुद्ध षष्ठी) | श्री वामन पंडित पुण्यतिथी दिन. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर |

| | | |
|---|---|---|
| | | ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. 'श्री वामन पंडितांचे वैराग्य' या प्रवचन वाचनास प्रारंभ. रात्रौ ९ वाजता सद्भक्ति मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| गुरुवार | दि. २७.४.२०२३ (वैशाख शु. सप्तमी) | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| शुक्रवार | दि. २८.४.२०२३ (वैशाख शुद्ध अष्टमी) | दुर्गाष्टमी. सायंकाळी ५.३० वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. रात्रौ ८ वाजता शेजोत्सव व उत्सव समाप्ती व कळकळीची विनंती. |
| गुरुवार | दि. ४.५.२०२३ (वैशाख शुद्ध चतुर्दशी) | श्री नृसिंह जयंती. सायंकाळी ५.३० वाजता. गु.बं. सदाशिव उभयकर ह्यांच्यातर्फे त्यांच्या घरी भजन. |

**गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथ्योत्सव**

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. १८.५.२०२३ (वैशाख वद्य चतुर्दशी) | गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथी दिन. ११.३० वाजता एकादशणी. नंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन.'पितापुत्र व गुरुशिष्य प्रेम' या प्रवचन वाचनास प्रारंभ. |

| **ज्येष्ठ मास :** | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. २०.५.२०२३ (ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा) | सायंकाळी सहा वाजता हळदीकुंकू समारंभ. |
| रविवार | दि. २१.५.२०२३ (ज्येष्ठ शुद्ध द्वितीया) | सायंकाळी ५.३० वाजता नामसंकीर्तन. |
| सोमवार | दि. २२.५.२०२३ (ज्येष्ठ शुद्ध तृतीया) | गुरुवर्य श्री बाबांच्या ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण व समाप्तीदिन आणि कळकळीची प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ३०.५.२०२३ (ज्येष्ठ शुद्ध दशमी) | गंगावतरण दिन. |
| बुधवार | दि. १४.६.२०२३ (ज्येष्ठ वद्य एकादशी) | श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी दिन. |
| गुरुवार | दि. २९.६.२०२३ (आषाढ शुद्ध ११) | आषाढी एकादशी. |

**विशेष सूचना :–** प्रत्येक उत्सवाचे दिवशी सकाळी स्तवन व प्रार्थना केली जाते.

✦✦✦

# शोकवृत्त



## कै. सौ. विजया भास्कर भोईर

(७ नोव्हेंबर १९४३-२३ जानेवारी २०२३)

आपणा सर्वांच्या लाडक्या व आवडत्या सौ. विजयाताई भास्कर भोईर यांचे २३ जानेवारी २०२३ ला दुःखद निधन झाले. त्या ७९ वर्षांच्या होत्या. आपल्या प्रेमळ व सर्वांची काळजी घेणाऱ्या स्वभावामुळे त्या सर्वांच्या कायम लक्षात राहतील. त्या आशावादी होत्या. याची प्रचिती त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला जाणवत असे. सद्भक्ती मंदिराशी त्यांचा कायमचा ऋणानुबंध होता. त्या त्यांच्या मुलांना व नातवंडांना नेहमी गुरुपौर्णिमा उत्सवाला मंदिरात जाऊन दादाभाईंचे आशिर्वाद घेण्यास प्रोत्साहन देत असत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो! ॐ शांती।।

## परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

### अमृत कण

१) जोपर्यंत मंडळीच्या सभासदात सर्वांची एकवाक्यता असते, तोपर्यंतच तुमच्यावर ईश्वराची कृपा राहील.

२) तुम्हाला कितीही त्रास झाला तरी किंचित डगमगू नका व सद्भक्ति सोडू नका. तुम्ही शेवटपर्यंत टिकलात तर तुम्हाला त्रास देणाऱ्यांच्या पुण्याईचे फळ तुमच्या पदरात पडेल. याकरिता सद्भक्तिव्रत पाळा, एवढीच माझी तुम्हाला विनंती आहे.

३) तुम्ही जर संकटात तोंड देऊन सद्भक्तिव्रत चिकाटीने चालवाल, तर तुमचा शेवट गोड होईल; परंतु ते व्रत चालविण्यासाठी संतांचाच सदोदित आश्रय केला पाहिजे.

४) आता लक्षात ठेवा की चुकूनही संतछल होऊ नये. वास्तविक, जे संतांचा छळ करतात, त्यांच्यावरच संतांनी पूर्वी केव्हातरी अनंत उपकार केलेले असतात व त्यांच्या त्या कृतघ्नतेच्या पापाचा घडा संतछल केल्याने फुटतो. जर संतांचा चुकून छळ झाला, तर तत्क्षणीच त्यांचे चरण धरावे व त्यांचे नाम घ्यावे.

५) सद्भक्तिव्रत चालविताना जेव्हा प्रभू येशू ख्रिस्ताप्रमाणे आमचे हाल होतील, तेव्हाच आमचे खरे कल्याण होईल. प्रभू येशूपेक्षाही आमचे हाल जास्त होतील त्याप्रसंगी आमचेही

विचार प्रभूसारखेच झाले पाहिजेत.

६) तुमच्या अंगी जेव्हा क्षमा हा गुण येईल व त्रास सहन करण्यास तुम्ही तयार व्हाल, तेव्हाच तुमचे तेज सर्व दूर पसरेल.

७) आपला कितीही छळ झाला तरी तो आपण सहन केला पाहिजे व आपल्या शत्रूला वैकुंठवास प्राप्त करून देण्यासाठी आपण शक्य तितके प्रयत्न करण्याची उदार बुद्धि ठेवली पाहिजे.

८) आपल्याला जे कोणी छळत असतील त्यांची कीव येऊन त्यांना सत्संगति, सद्भक्ति व वैकुंठप्राप्ति करून देण्यास तुम्ही रात्रंदिवस ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे तरच तुमचे सद्भक्तिव्रत सफळ होईल.

९) अशा प्रकारे दृढनिश्चयाने जर तुम्ही सद्भक्तिव्रत पाळाल, तरच सर्व देव व संत तुमचे कौतुक करतील.

✦✦✦

## : देणगीदारांसाठी निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबईबाहेर, काही महाराष्ट्राबाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरुवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

**Name of the account : SADBHAKTI PRASARAK MANDALI**

| | | |
|---|---|---|
| **Bank Name** | : | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | : | 006100100000130 |
| **IFSC Code No.** | : | NKGS0000006 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 60. |

**OR**

| | | |
|---|---|---|
| **Bank Name** | : | Bank Of India |
| **Account No** | : | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | : | BKID0000164 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 60. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीटपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.

**Mr. Vivek Tamhane**

Tamhane & Mehta (Chartered Accountants)

1, Gauresh Apartment, Ground Floor,

Old Police Lane,

Near Andheri Court, Andheri (East),

Mumbai : 400 069.

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **१. श्री. विवेक ताम्हाणे** | **मोबाईल :** | **९८२०३५०८६७**<br>**9820350867** |
| **२. श्री. नागानंद निळेश्वर** | **मोबाईल :** | **९८२१२७०७७२**<br>**9821270772** |
| **३. श्री. अरूण विजयकर** | **मोबाईल :** | **९२२३२२२२४५**<br>**9223222245** |

✦✦✦

# शोकवृत्त

श्रीमती सरिता दत्तात्रय सुळे यांचे दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रदीर्घ आजाराने, जोगेश्वरी येथे निधन झाले. त्यांचा विवाह कै. श्री. दत्तात्रय महादेव सुळे उर्फ दत्ताबाळ यांजबरोबर झाल्यावर, त्या नियमित मंदिरात येऊ लागल्या. मंदिरातील उत्सवात त्यांची नेहमी उपस्थिती असे.

त्यांचा मुलगा श्री. अमित दत्तात्रय सुळे व समस्त सुळे कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. देव मृतात्म्यास सद्‌गती देवो!